प्रकाश-वंदना

~ गुरुमाई चिद्विलासानंद

तुमच्या जीवनाचा प्रत्येक क्षण सत्याच्या प्रकाशाने झगमगत राहो

तुमचे मन चिदाकाशात अंथरलेल्या सुखशय्येवर विश्रांत होवो

तुमच्या बुद्धीला तेजाची पूर्णतया अनुभूती होवो

तुमच्या हृदयात भगवंताची ज्योत सदासर्वदा विराजमान राहो

तुमचा प्रत्येक श्वासोच्छ्वास शक्तीच्या प्रभेने ओतप्रोत असो

तुमची सकाळ सुरू होवो गुरुकृपेप्रतिच्या कृतज्ञतेने

आणि दिवसाची सांगता होवो श्रीगुरूंप्रतिच्या तुमच्या आभाराने

दीपावलीच्या मंगलकामना!

***

ऋग्वेदाच्या एका ऋचेत म्हटले आहे—

परम सत्य एकच आहे

ज्याला ज्ञानीजन विविध नावांनी संबोधतात.

त्याचप्रमाणे दिव्याचे सत्त्व एकच आहे

हे सत्त्व आहे तेज

हेच तेज सूर्यामध्ये आणि चंद्रामध्ये आहे

लोकांच्या नेत्रांमध्ये आहे

त्यांच्या हास्यामध्ये व त्यांच्या मंदस्मितामध्ये आहे

इतरांच्या सुख-सौभाग्यासाठी असलेल्या
त्यांच्या प्रार्थनांमध्ये आहे
त्यांच्या सदिच्छांमध्ये आहे
त्यांच्या शुभेच्छांमध्ये आहे
श्रीगुरूंच्या अपरंपार कृपेमध्ये आहे
ईश्वराच्या आशीर्वादामध्ये आहे

पाहा ना, भारताच्या भिन्नभिन्न प्रांतांमध्ये
दीपावलीच्या निरनिराळ्या कथा प्रचलित आहेत
तरीदेखील दीप तोच आहे
दिव्याची ज्योत तीच आहे
पूजा-आराधना करण्याची प्रथा तीच आहे
आपल्याला बाह्य प्रगतीपेक्षा कितीतरी अधिक
अंतरीची प्रगती करावी लागेल
कारण आपल्या अस्तित्वाचा वास्तविक पाया
आपल्या अंतरी आहे
पूजाअर्चा करण्याच्या ज्या रिवाजाचे बीज
आपल्या पूर्वजांनी पेरले होते
आणि हा ठेवा आपल्याला सुपुर्द केला होता
त्याकडे आपण कानाडोळा करता कामा नये
त्या रिवाजामध्ये जी शक्ती आहे
ती केवळ बाह्य प्रगतीमध्ये नाही.

जे स्नेह-साधन आहे, जे प्रभु-साधन आहे
जे ज्ञान-साधन आहे, जे आत्म-साधन आहे
जे भक्ति-साधन आहे, जे मोक्षाचे साधन आहे
ते तर प्रकाशाने सतत चमचमत असते
कितीतरी वेळा आपल्याला अशा लोकांची गरज असते
जे आपल्याला या गोष्टीची आठवण करून देत राहतील.

ही गरज यासाठी असते
कारण युगानुयुगे लोकांना एक सवय लागली आहे
ती सवय कोणती आहे?
ती सवय आहे काही ना काही शोधत राहण्याची
शोधत राहण्याचे व्यसन लागले आहे त्यांना
इथे शोधणे, तिथे शोधणे
इथे पाहणे, तिथे पाहणे
याला विचारणे, त्याला विचारणे
कधी या व्यक्तीच्या मागे धावणे
कधी त्या व्यक्तीची स्वप्ने हिसकावून घेणे
विचारांचे कधी या दिशेला जाणे
कधी त्या दिशेला जाणे
पुन्हापुन्हा त्याच वाटेवर परत जाणे
त्याच जीर्णशीर्ण वाटेवर
जरी त्यांना चांगले माहीत असते की
त्या वाटेवर परत जाऊन
काहीच प्राप्त होणार नाही
त्यांच्या हाती काहीही लागणार नाही
मग आपला तोच राग आळवत राहण्याचे
वेड त्यांच्या डोक्यात का भरलेले असते?
मनात बांधलेल्या त्याच घरट्यात वारंवार परत येणे
त्याच जुन्या गोष्टींमध्ये, जुन्या विचारांमध्ये अडकून राहणे
ज्यांमध्ये ना काही अर्थ उरला आहे,
ज्यांमध्ये ना काही शिल्लक राहिले आहे
फक्त गोलगोल फिरत राहणे
असे करतकरत एक घमासान युद्ध छेडणे
आपल्या स्वतःशी

लोकांशी
आणि आपल्या सभोवतालच्या जगाशी
स्वतःशी अंतर्द्वंद्वामुळे युद्ध
इतरांशी आपल्या या विचारसरणीमुळे युद्ध की
माझे जीवन त्यांच्यापेक्षा उत्तम नाही
अशाच कपोलकल्पित संघर्षांमध्ये गुरफटून राहिल्यामुळे
ते तृप्तीची कास धरूच शकत नाहीत.

ही गोष्ट तुम्हाला ओळखीची वाटते का?
हो, तुम्हाला याची चांगलीच कल्पना आहे
याविषयी मला काहीही शंका नाही.

चला, मी हा विषय पुढे नेते.
तुम्हाला तर नक्कीच माहीत असेल की कोणतीही वस्तू
केवळ प्रकाशामुळे चमकते
उजेडामुळे प्रकट होते
जेव्हा एखादी गोष्ट प्रकाशमय दिसते
तेव्हा तुमच्या नजरा तिच्याकडेच वळतात
दरवर्षी आपण दीपावलीचा सण साजरा करण्यास उत्सुक असतो
कारण हा एक असा उत्सव आहे जेव्हा
गोडगोड भावना आपल्या हृदयात साठवण्यासाठी
आपल्याला जास्त प्रयत्न करावा लागत नाही
दीपावलीच्या
चमकदार
झगमगणाऱ्या
सुंदर
रमणीय ज्योती

अंतरीचा आनंद
मनाची प्रशांती
हृदयाची अमर्याद प्रसन्नता
आशांची सुखद स्वप्ने
यांना पुन्हा प्रत्यक्षात प्रकट करतात
होय की नाही?
अंतरीच्या अगोचर शक्तीची ऊब
तिची द्युती
बाहेरच्या अग्नीद्वारे प्रकट होते
अंतःकरणात जे कोणते तत्त्व दडलेले आहे
जो कोणता भावसंवेग,
जो कोणता जोश दडलेला आहे
बाहेरचा अग्नी त्याला प्रकाशमान करतो
दिव्याची ज्योत पवित्रतेचे प्रतीक आहे.

जेव्हा आपण सद्‌गुणांचे वर्णन करतो
तेव्हा त्यांमध्ये प्रधानता कशाची असते?
प्रकाशाची.
ज्याप्रमाणे हिऱ्याची ओळख त्याची चकाकी असते
आणि सोन्याची ओळख असते त्याची झळाळी
त्याचप्रमाणे सद्‌गुणात असलेली कांती त्याचे वैशिष्ट्य आहे
याच कारणाने आपण स्वभावतः
त्या लोकांकडे खेचले जातो
जे चांगले गुण दर्शवतात
परंतु ज्या लोकांमध्ये आपल्याला दुर्गुणांचा आभास होतो
आपण लगेचच त्यांच्यापासून दूर पळू इच्छितो.
का?

आपल्या अंतरी खळबळ माजू लागते.
का?
जेव्हा आपण दुर्गुणांविषयी बोलतो
तेव्हा त्यांमध्ये प्रधानता असते अंधकाराची
तिमिराचा तर हाच पेशा आहे—
शक्य होईल तितके तुम्हाला स्वतःच्या जाळ्यात अडकवणे
तुमच्या डोळ्यांवर अज्ञानाचा पडदा टाकून ठेवणे
आणि तुम्हाला असा दिलासा देणे की काही विचारूच नका!
तुम्ही चटकन त्याच्या फसवणुकीला बळी पडता
हो, गोष्ट तर हीच आहे ना.
जेव्हा गडद काळोख तुम्हाला त्याच्या अणकुचीदार पंजांमध्ये
जकडून घेतो तेव्हा तुमची बुद्धी
सद्भावनेपासून मैलोगणती दूर निघून जाते
आणि कंबर कसून उलटसुलट काम करू लागते
दुर्भावनांनी घेरली जाते
जे अंधकारातून प्रतिध्वनित होते त्यालाच खरे मानण्याचा
हट्ट तुम्ही धरता
तुम्ही अडेलतट्टू बनता
तुम्हाला दुसरे काही दिसतच नाही
तुम्हाला दुसरे काही सुचतच नाही.

प्रकाश दीपशिखेमध्येदेखील आहे
अग्नीच्या ज्वालेतदेखील आहे.
अग्नीची अनेक रूपे आहेत जसे—
मृदू अग्नी
शांत अग्नी
प्रचंड अग्नी
जठराग्नी

प्रेमाचा अग्नी
साधनेचा अग्नी
तपाचा अग्नी
आत्मशुद्धीचा अग्नी
आदि-इत्यादी. . .
अग्नी प्रकाशाचा द्योतक आहे
परंतु आपण जेव्हा अग्नीचा आदर करत नाही
तेव्हा तो कदाचित उग्र रूप धारण करतो
अग्नीचे उग्र रूप आहे क्रोध
ज्याचे एकच गंतव्य आहे
प्रत्येक ठिकाणी विनाशच विनाश
विनाशापासून बचाव करायचा असेल तर या क्रोधरूपी अग्नीचे
शमन करावेच लागेल
त्याचा दाह शांत करावाच लागेल
शांतीने शांती पसरते.

दीपावलीचा सण दिव्यांच्या ओळींनी सुसज्जित असतो
जिकडे पाहावे तिकडे ज्योतीचा प्रसार
जिकडे दृष्टी टाकाल तिकडे दिव्याची आभा
प्रत्येक दिव्याचे स्वरूप स्वर्णमय
असे वाटते की चारही दिशा
ही धरती आणि हे अंबर
सौंदर्याच्या देवीच्या
चंद्र-ताऱ्यांनी जडलेल्या शालूने आच्छादित आहेत
सर्वत्र चैतन्यमय तेजाची आणि
आनंदोल्लासाची उधळण झाली आहे
दीपावलीच्या पर्वामध्ये ना कुठला भेद आहे, ना कोणता द्वेष आहे
ना कोणता रुसवा आहे, ना कोणती तक्रार आहे

हा सण सर्वांना आपुलकीच्या रंगात रंगवून टाकतो
प्रेम आणि सौजन्याने ओतप्रोत करतो
घर कोणाचेही असो
श्रीमंताचे असो, वा गरीबाचे
दीपावलीचा सण प्रत्येकाला आश्रयाचा संकेत देतो
तसे पाहता प्रत्येक देवालयात आरतीचा दिवा दररोज प्रज्वलित होतो
परंतु दीपावलीच्या तेजोमय दिव्यांच्या ज्या ओळी आहेत
त्यांचे मनमोहक रूप अनोखे आहे
आणि त्यांची दीप्ती प्रत्येकासाठी आहे
हृदयाच्या अंगणात जेव्हा दिव्य ज्योतीचा सुगंध दरवळतो
तेव्हा तो आपल्यासाठी हा संदेश घेऊन येतो,
तुमचा आवाज प्रेमाने बुलंद करा
मनातील वेदनेला प्रकाशाने पुनीत करा
दीप राग गा
दीप तालावर नृत्य करा
दिव्याचा झंकार ऐका
दीप चेतना अनुभवा

शुभ दीपावली!

दीप आहे छोटा, त्याची शिखा आहे तेजस्वी
दीप आहे विनम्र, त्याची आकृती आहे रूपवती
दीप आहे सदा प्रफुल्लित, त्याचे लक्षण आहे निष्पक्ष
दीप आहे निश्चिंत, त्याच्या प्रकाशाची किरणे आहेत निस्सीम
दीप आहे अनमोल, त्याचे योगदान आहे प्रबळ
काय आहे ते योगदान?
सर्वांना एकत्र आणणे आणि
सर्वांनी एकत्र येऊन आनंदाने

मंगलमय जीवनासाठी आभार व्यक्त करणे

दिव्याचे अस्तित्वच असे आहे की
तो इतरांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यास समर्थ आहे
दीपावली उत्सवाच्या समयी प्रदीप्त दीपमालांद्वारे
सर्व देवीदेवतांची पूजा नैसर्गिकरीत्या होतच असते
जेव्हा लोक श्रद्धा, विश्वास, भक्ती, आदर आणि सन्मान यांनी
पूरित असलेल्या हृदयाने एकमेकांना भेटतात
तेव्हा त्यांच्या आंतरिक ऊर्जेतदेखील वृद्धी होते
मन उत्साहाने आणि उल्लासाने ओसंडून वाहू लागते
अग्नितत्त्वाला समस्त जगतात—तिन्ही लोकांमध्ये—
एक उच्च स्थान दिले गेले आहे.

दिव्याद्वारे सुख-सुधा	सुखदीप
दिव्याद्वारे प्रेम-क्षेम	प्रेमदीप
दिव्याद्वारे गुरुकृपा	गुरुदीप
दिव्याद्वारे ज्ञानबोध	ज्ञानदीप
दिव्याद्वारे भक्तिभाव	भक्तिदीप
दिव्याद्वारे आनंदरस	आनंददीप
दिव्याद्वारे शांतिछाया	शांतिदीप
दिव्याद्वारे मोक्षसाधन	मोक्षदीप

शुभ दीपावली!

‘दीपज्योतिस्तोत्रम्’चा हा श्लोक मला खूप आवडतो
म्हणून हा तुमच्या समक्ष ठेवते आहे
तुमच्यापैकी अनेक जणांना हा श्लोक परिचयाचादेखील असेल

भारतात हे स्तोत्र मौखिक परंपरेद्वारे
पिढ्यान्‌पिढ्या जतन करून ठेवले गेले आहे
याचे संरक्षण भक्तांद्वारे मोठ्या श्रद्धेने केले गेले आहे

शुभं करोति कल्याणमारोग्यं धनसम्पदा।
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोऽस्तु ते॥

हे तेजोमय दीप-ज्योती!
जी मंगलमय आणि कल्याणकारी आहे
जी आरोग्य आणि धनसंपदा प्रदान करणारी आहे
जी अंतरीच्या तिमिररूपी शत्रूचा विनाश करणारी आहे
अशा त्या दीप-ज्योतीला माझा नमस्कार.

सिद्धयोग मार्गावर आरतीचा अभ्यास बहुमूल्य आहे
आपल्या इष्टदेवतेसमोर आभामंडित ज्योतीने
त्यांना ओवाळताना
तुम्ही त्या पावन स्थानाला ज्योतिर्मय बनवता
जिथे तुमची इष्टदेवता वास करते
असे करताना, त्याबरोबरच,
तुम्ही तुमच्या अस्तित्वात
सद्ज्ञानाच्या आणि शक्तीच्या प्रवाहाला ज्योतिर्मय करता
तुमच्या आरतीचे फळ
तुमच्या पूर्वजांपर्यंत पोहोचते आणि
आरतीच्या दर्शनाने
तुमचे जन्मजन्मांतर सफल होते
‘चिद्विलासस्तव’ यामधून उद्धृत हा श्लोक
तुम्हाला आरतीमधील मर्माचा
तिच्या गहन अर्थाचा
अधिक सखोल बोध करवतो

पञ्चधा प्रसरतश्चिदात्मनो ह्यान्तरस्य बहिरिन्द्रियाध्वना।
सामरस्यमिह संविदात्मनारात्रिकं परमिदं समीरितम्॥

इष्टदेवतेसमोर प्रज्वलित दिव्याने आरती करण्याचा परम अर्थ आहे
अंतर्निहित चेतन आत्म्याचे
परम चितिशी सामरस्य, पूर्ण मिलन.
हा अंतर्निहित चेतन आत्मा
पाच बाह्य इंद्रियांच्या मार्गांनी
शुद्ध चितीच्या दिशेने मिलनासाठी प्रवाहित होतो.

शुभ दीपावली!

नववर्षाच्या शुभेच्छा!

सप्रेम,
गुरुमाई चिद्विलासानंद

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.